**बंदर विकास धोरण २०१६ मध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : धोरण-०५१८/प्र.क्र.१९/बंदरे-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- १९ जुलै, २०१९

<u>वाचा</u> :- शासन निर्णय क्रमांक धोरण-१०१५/प्र.क्र.२६५/बंदरे-१, दिनांक ०४.०२.२०१६.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.लांबीची किनारपट्टी लाभली असून त्यावर २ मोठी बंदरे आणि ४८ लहान बंदरे आहेत. बंदर क्षेत्राच्या विकास व नियमनाकरीता राज्य शासनाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. किनारपट्टीवरील लहान बंदरांचे नियंत्रण, विकास व नियमन याकरिता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, १९६६ अन्वये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची स्थापना करण्यात आली आहे. तद्नंतर राज्याचे बंदर धोरण टप्प्याटप्प्याने विकसित होत गेले आहे. सद्यःस्थितीत राज्याचे बंदर विकास धोरण-२०१६ कार्यरत आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये येणा-या अडचणी यांचा साकल्याने विचार करुन सध्या अस्तित्वात असलेले बंदर विकास धोरणामध्ये बदल करण्याचा निर्णय महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या ७३ व्या बैठकीत घेण्यात आला होता. सदर निर्णयानुसार व संबंधित विभागांशी सल्लामसलत करुन, बंदर विकास धोरण-२०१६ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे बंदर विकास धोरण- २०१६ मध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

बंदर विकास धोरण २०१६ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. अस्तित्त्वातील सवलत करारनामाधारकांना उपसवलत करारनामा (Sub Concession Agreement) साठी त्यांच्याकडून तिप्पट व्हार्फेज शुल्क आकारणीबाबतची अट रद्द करुन, त्यांना दिडपट व्हार्फेज शुल्क आकारण्यांत यावे.

२. सवलतीच्या/ भाडेपट्टीच्या कालावधीचे सुसूत्रीकरण :

a. "ग्रीन फिल्ड पोर्ट" (Green Field Port) किंवा "बहूउद्देशीय जेट्टी" (Multipurpose Jetty) याकरिता "सवलत करारनामा" (Concession Agreement) याचा कालावधी ३५ वर्षांवरून ५० वर्षे एवढा वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र बंदर विकास कालबद्धरित्या होण्यासाठी सवलत करारनामा (Concession Agreement) च्या ७०% कालावधी पूर्ण झाल्यावर (५० वर्षाच्या ७० % कालावधी म्हणजे ३५ वर्षे ) जर १००% भांडवली गुंतवणूक करुन ५०% माल हाताळणी उद्दीष्ट (Handling of Cargo) साध्य केले तरच अशा "ग्रीन फिल्ड पोर्ट (Green Field Port) किंवा बहूउद्देशीय जेट्टी (Multipurpose Jetty) याकरिता सवलत करारनामा (Concession Agreement) चा कालावधी ३५ वर्षांवरुन ५० वर्ष अनुज्ञेय राहील. अन्यथा सवलत करारनामा (Concession Agreement) चा कालावधी ३५ वर्षानंतर संपुष्टात येईल.

b. जहाजबांधणी व जहाज दुरुस्ती (Shipyard) साठी सवलत करारनामा (Concession Agreement) चा कालावधी १० वर्षांवरून ३० वर्ष एवढा वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र "शिपयार्ड" (Shipyard) करिता सवलत करारनामा (Concession Agreement) च्या ७० टक्के कालावधी पूर्ण झाल्यावर (३० वर्षाच्या ७०% म्हणजे २१ वर्ष) जर १०० भांडवली गुंतवणूक करुन जहाज बांधणी, जहाज दुरूस्ती उद्दीष्टांनुसार ५०% उद्दीष्ट साध्य केले तरच "बंदर विकास धोरण २०१६" प्रमाणे "जहाजबांधणी व जहाज दुरुस्ती" (Shipyard) करिता "सवलत करारनामा" (Concession Agreement) चा कालावधी २१ वर्षांवरुन ३० वर्षे अनुज्ञेय राहील. अन्यथा "सवलत करारनामा" (Concession Agreement) चा कालावधी २१वर्षानंतर संपुष्टात येईल .

c. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मालकीच्या जेट्टीकरिता सवलत करारनाम्याचा कालावधी प्रथम १५ वर्षासाठी ठेवण्यात यावा व पुढे आणखी १५ वर्षांपर्यंत

वाढविण्यात येईल. परंतु, सदर कालावधी पुढील १५ वर्षापर्यंत वाढविण्यासाठी, विकासकाने सविस्तर प्रकल्प अहवालात नमूद केलेल्या माल हाताळणीच्या उद्दीष्टानुसार, जेट्टी प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून १५ वर्षात सरासरी ५०% उद्दीष्ट पूर्ण करणे बंधनकारक राहील.

३. बंदर विकास धोरण- २०१६ मध्ये कलम ५.१ मध्ये, कॅप्टीव्ह जेट्टीवरुन देशांतर्गत माल (Non-EXIM cargo) हाताळणी अनुज्ञेय असेल.

४. बंदर विकास धोरण- २०१६ मध्ये कलम ५.२ मध्ये, बहुउद्देशिय जेट्टीवरुन आयात-निर्यात माल (EXIM cargo) हाताळणी अनुज्ञेय असेल.

५. बंदर विकास धोरण- २०१६ मध्ये कलम ५.३ मध्ये, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या जेट्टीचा वापर माल हाताळणी व्यतिरिक्त, प्रवासी/ रो-रो वाहतूक, पर्यटन, सागरी प्रशिक्षण/ संशोधन व इतर सागरी कामांसाठी अनुज्ञेय राहील.

६. बंदर विकास धोरण- २०१६ मध्ये कलम ६.१.१ मध्ये, किनारी नौपरिवहनाद्वारे (Coastal Shipping) देशांतर्गत माल (Non-EXIM cargo) हाताळणीसाठी "बहुउद्देशिय जेट्टी" ऐवजी "कोस्टल बर्थ" असा बदल करण्यात यावा.

७. मरीना प्रकल्पांसाठी कलम ११.१.२ अन्वये शासकीय तसेच भरती-ओहोटीच्या क्षेत्रातील जमीन मंजूर करतांना स्पर्धात्मक निविदा/ स्वीस चॅलेंज पध्दतीने विकासकाची निवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे व नवी मुंबई या जिल्हयांतील बंदर विषयक सुविधांच्या प्रकल्पासाठी खाजगी विकासकांना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत उपलब्ध करुन द्यावयाच्या भरावाद्वारे निर्माण झालेल्या जमिनीचे भरती आहोटीचे क्षेत्रातील (Inter Tidal Zone) आगाऊ स्वरुपात रक्कम (Upfront Payment) म्हणून जमिनीचे मुल्यांकन खालील प्रमाणे आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ) ज्या विकासकाचा करारनामा २० वर्षापर्यन्त असेल अशा विकासकांकडून शीघ्रसिध्द गणकाप्रमाणे (Ready Reckoner) होणा-या मुल्यांकन रकमेच्या १/४ इतकी रक्कम मुल्यांकनापोटी आकारण्यांत यावी.

ब) ज्या विकासकाचा कराररनामा ३५ वर्षापर्यन्त असेल अशा विकासकांकडून शीघ्रसिध्द गणकाप्रमाणे (Ready Reckoner) प्रमाणे होणा-या मुल्यांकन रकमेच्या १/३ इतकी रक्कम मुल्यांकनापोटी आकारण्यांत यावी.

क) ज्या विकासकाचा कराररनामा ५० वर्षापर्यन्त असेल अशा विकासकांकडून शीघ्रसिध्द गणकाप्रमाणे (Ready Reckoner) होणा-या मुल्यांकन रकमेच्या १/२ इतकी रक्कम मुल्यांकनापोटी आकारण्यांत यावी.

९. मा.मंत्रीमंडळाने वरील सुधारणा पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यास मान्यता दिली आहे.

हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३३४/२०१९, दिनांक ०७.०३.२०१९, वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०४/२०१८, दिनांक १८.०४.२०१९, महसूल व वन विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक १९/२०१९, दिनांक ०७.०३.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७१९१५३१०६४२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shaila Ravindra Mithbavkar

Digitally signed by Shaila Ravindra Mithbavkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8bb03c6d206c79568018ba9511400e3bd24537b79e0985b2d7a66c816ab002f9, cn=Shaila Ravindra Mithbavkar
Date: 2019.07.19 15:36:04 +05'30'

**( शैला मिठबावकर )**
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
३. मा.राज्यमंत्री (बंदरे),यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई -४०० ०३२
४. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

६. मा.प्रधान सचिव (परिवहन व बंदरे), गृह विभाग, मंत्रालय,मुंबई -४०० ०३२
७. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
९. अपर मुख्य सचिव (नियोजन ), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१०. अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११. प्रधान सचिव (नवि-१/नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१२. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३. प्रधान सचिव,पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१४. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
१५. प्रधान सचिव (पर्यटन) , पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
१६. महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका (कोकण विभाग)
१७. संचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण,पुणे
१८. अध्यक्ष, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, नवी मुंबई
१९. अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट,मुंबई
२०. सर्व जिल्हाधिकारी
२१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई-४०० ००१
२२. निवडनस्ती (बंदरे-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.